महाराष्ट्र शासन

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर

# कार्यवृत्तांत

अनधिकृत सावकारी व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींवर कारवाई करण्याच्या उद्येशाने तसेच सावकारी व्यवसायावर योग्य नियंत्रण ठेवण्यासाठी महाराष्ट्र सावकारी (नियमन) अनिनियम,२०१४ ची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्याबाबत दि.१.३.२०१७ रोजीचे शासन निर्णयान्वये जिल्हास्तरावर त्रिसदस्यीय समिती गठीत करण्यात आलेली असून मा.जिल्हाधिकारी हे सदर समितीचे अध्यक्ष असून मा.जिल्हा पोलीस प्रमुख हे सदस्य आहेत. व समितीचे सदस्य सचिव जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था हे आहेत.

मा.जिल्हाधिकारीसो,कोल्हापूर यांचे अध्यक्षतेखाली दि.११ ऑक्टोबर,२०२१ रोजी सांय.६.००वाजता कोल्हापूर जिल्हयात अनधिकृत सावकारी व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींवर कारवाई करण्याच्या उद्येशाने तसेच सावकारी व्यवसायावर योग्य नियंत्रण ठेवण्यासाठी महाराष्ट्र सावकारी (नियमन) अनिनियम,२०१४ ची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्याच्या दृष्टीने कार्यवाही आढावा बैठक अयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील अधिकारी उपस्थित होते.

- मा.डॉ.राहूल रेखावार,जिल्हाधिकारी,कोल्हापूर तथा समिती अध्यक्ष
- मा.श्री.शैलेश बलकवडे,जिल्हा पोलीस अधीक्षक,कोल्हापूर तथा समिती सदस्य यांचे प्रतिनिधी श्री.प्रमोद जाधव,पोलीस निरीक्षक
- श्री.अमर शिंदे,जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,कोल्हापूर तथा समिती सदस्य सचिव.

उपरोक्त बैठकीमध्ये खालीलप्रमाणे माहिती सादर करण्यात आली व त्याबाबत चर्चा करणेत आली.

१. कोल्हापूर जिल्हयात अवैध सावकारीचे अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीची माहिती सादर करणेत आली.

२. अवैद्य सावकारीच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या तक्रारीस अनुसरुन कोल्हापूर जिल्हयातील विविध तालुक्यातील ४८ ठिकाणी अवैद्य सावकारीच्या अनुषंगाने नियुक्त पथकांमार्फत धाडी टाकण्यात आल्या त्यापैकी १६ ठिकाणी अवैद्य सावकारीच्या अनुषंगाने कागदपत्रे आढळल्याने संबंधित पोलीस ठाणेमध्ये गुन्हा नोंद करणेत आला. तसेच धाड टाकलेल्या १५ ठिकाणी चौकशीअंती अवैध सावकारी आढळून आलेली नाही. उर्वरित १७ प्रकरणांमध्ये क्षेत्रिय कार्यालयात सुनावणीचे कामकाज सुरु असलेची माहिती देणेत आली.

३. मा.अध्यक्षांनी पुढील बैठकीपुर्वी १७ प्रकरणे त्वरीत निकाली काढून त्याबाबतच्या माहितीसह उपस्थित राहणेबाबत सुचना केल्या.

४. नोंदणीकृत सावकार हे कर्जदाराकडून कोणत्या प्रकारे कर्जवसूलीबाबतची प्रोमीसरी नोट लिहून घेतात त्याबाबतचा नमुना सादर करणेस सुचित केले.

कोल्हापूर जिल्हयात केलेल्या कार्यवाहीबाबत मा.अध्यक्ष महोदयांनी सहकार विभाग,पोलीस प्रशासन व महसूल विभागाचे अभिनंदन केले व सावकारी कायद्याची कडक अंमलबजावणी करुन अवैध सावकारांच्यावर त्वरीत कार्यवाही करुन सावकारांच्या पाशात अडकेलल्या अगर सावकारांकडून पिळवणूक होत असलेल्या व्यक्तींना न्याय मिळवून देणेबाबत आवश्यक ती मदत करणेत येईल असे समितीस आश्वासित केले.

उपरोक्त प्रमाणे बैठकीचे कामकाज झाले व बैठक समाप्त करण्यात आली.

सदस्य सचिव
तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था,कोल्हापूर

मा.सदस्य
तथा पोलीस अधीक्षक,कोल्हापूर

मा.अध्यक्ष तथा,जिल्हाधिकारी,कोल्हापूर

Scanned with CamScanner